**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्तविभाग**

**राष्ट्रीय बातमीपत्र**

**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः23.04.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांच्या निवासस्थानी संरक्षणविषयक उच्च स्तरीय बैठक
- अक्षय्य तृतीयेच्या मुहुर्तावर आजपासून चारधाम यात्रेला सुरुवात
- भारत-अमेरिकेदरम्यानची व्यापारासंदर्भातील चर्चा सकारात्मक असल्याचं अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप याचं प्रतिपादन

- आंध्रप्रदेशमध्ये भिंत कोसळून 8 जणांचा तर कोलकात्यातील उपाहार गृहाला लागलेल्या आगीत 14 जणांता मृत्यू

आणि

- देशाच्या काही भागात पाऊस तर काही भागात उष्णतेची लाट

**पंतप्रधान**

पेहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीतल्या त्यांच्या निवास स्थानी संरक्षणविषयक उच्च स्तरीय बैठक घेतली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान आणि तीनही सैन्य

दलांचे प्रमुख या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही पंतप्रधानांची भेट घेतली. संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रमुख अँटेनिओ गुटरेझ यांनी पेहलगाम हल्ल्याबद्दल कडक शब्दांत निषेध व्यक्त केला. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ जयशंकर यांच्याशी दूरध्वनीवरुन झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. दरम्यान, जयशंकर यांनी काल ग्रीस, सायप्रस, पनामा, सोमालीया, स्लोवेनीया आणि गयाना या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांशी पेहलगाम हल्ल्यासंदर्भात दूरध्वनीवरुन चर्चा केली. पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याविरोधात भारताला पाठिंबा दर्शवल्याबद्दल या सर्व परराष्ट्र मंत्र्यांचे आभार व्यक्त केले.

**संयुक्तराष्ट्र**

भारतानं संयुक्त राष्ट्रांमध्ये पहलगाम हल्ल्याचा मुद्दा जोरकसपणे उपस्थित केला तसंच आपल्या मुद्द्याच्या समर्थनार्थ पाकिस्तान दहशतवाद्यांना प्रशिक्षण आणि पैसे पुरवत असल्याच्या पाकिस्तानच्या मंत्र्यांच्या वक्तव्याचाही दाखला दिला. सगळ्या जगानं पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांचा कबूलीजबाब ऐकल्यामुळे पाकिस्तान दहशतवादाला खतपाणी घालत असून अस्थिरता पसरवत असल्याचं उघड झालं आहे असं संयुक्त राष्ट्रांमधल्या भारताच्या स्थायी प्रतिनिधी योजना पटेल यांनी म्हटलं आहे.
जगभरातल्या नेत्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताला दिलेल्या पाठिंब्यासाठी तसंच या कठीण काळात भारतासोबत असल्याचं सांगितल्याबद्दल योजना पटेल यांनी सर्वांना धन्यवाद दिले.

**राज्यमंत्री मंडळ निर्णय**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यु झालेल्या महाराष्ट्रातल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी 50 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय काल राज्य मंत्रीमंडळानं घेतला. ज्यांच्या घरी शिक्षणाचा प्रश्न असेल तर तो सोडवण्याचा, रोजगाराचा प्रश्न

असल्यास त्यांच्या पाल्यांना शासकीय नोकरी देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**जम्मू-आणि-काश्मीर**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये, काश्मीर प्रदेशात येणाऱ्या सर्व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्यात आल्या आहेत. अशी माहिती काश्मीरचे पोलिस महानिरीक्षक व्ही के बिरदी यांनी आकाशवाणीला दिली. याभागात पर्यटकांची संख्या वाढत आहे.

**YUGM परिषद**

भारतातील नवोन्मेष क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खाजगी गुंतवणूकीला चालना देण्याच्या उद्देशानं नवी दिल्लीत प्रथमच युगम परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. देशातील तरुणांना स्वावलंबी बनवणाऱ्या कौशल्यांनी सक्षम करण्याचा आणि भारताला जागतिक नवोन्मेषाचं केंद्र म्हणून स्थान मिळवून देण्याचा युगमचा उद्देश असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी YUGM परिषदेत केलं. 21 व्या शतकाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी देशाच्या शिक्षण व्यवस्थेचे आधुनिकीकरण केंद्र सरकार करत आहे. नवीन शिक्षण धोरण देशात परिवर्तन घडवून आणत आहे, असंही त्यांनी नमूद केलं. संशोधन क्षेत्राला बळकटी देण्यासाठीही सरकार कटीबध्द असल्याचं ते म्हणाले.

**सर्वोच्च न्यायालय**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई हे भारताचे पुढचे सरन्यायाधीश असतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती गवई यांची भारताचे पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. पुढील महिन्याच्या 14 तारखेपासून ते आपला

कार्यभार सांभाळतील. अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली.

**चारधाम-यात्रा**

अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्यातील गंगोत्री आणि यमुनोत्री धामचे दरवाजे पारंपरिक पध्दतीनं उघडल्यानंतर आजपासून चार धाम यात्रा सुरू होईल. मुकबा गावात सहा महिने हिवाळी वास्तव्यानंतर, काल गंगा देवीची पालखी गंगोत्री धामसाठी रवाना करण्यात आली. आज पालखी यात्रा भैरवघाटीहून गंगोत्रीकडे निघेल, जिथे मंदिराचे दरवाजे सकाळी 10:30 वाजता पारंपारिक प्रार्थना आणि वैदिक मंत्रोच्चारांसह उघडले जातील. अशी माहिती तीर्थ पुरोहित राजेश सेमवाल यांनी दिली. दुसरीकडे, माँ यमुनेची पालखी आज सकाळी खरसाली इथल्या हिवाळी निवासस्थानातून यमुनोत्री धामसाठी रवाना होईल, जिथे मंदिराचे दरवाजे सकाळी 11:55 वाजता भाविकांसाठी उघडले जातील. केदारनाथ धामचे दरवाजे शुक्रवारी उघडतील आणि बद्रीनाथ धामचे दरवाजे रविवारी उघडतील. आकाशवाणीवरुन या यात्रेची सुरुवातीसंदर्भात थेट प्रक्षेपण केलं जाईल. गंगोत्री धामच्या कपाटांच्या उद्घाटनाचे थेट प्रक्षेपण सकाळी 10 ते 11 या वेळेत तर यमनोत्री धामचं थेट प्रक्षेपण सकाळी 11.30 ते दुपारी 12.30 या वेळेत उपलब्ध असेल.

**भारत-अमेरिका**

भारत आणि अमेरिकेदरम्यान आयात शुल्कासंदर्भातील बोलणी चांगल्या पातळीवर सुरु असून लवकरच व्यापार करार यशस्वी होईल अशी आशा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी व्यक्त केली आहे. ते काल मिशिगनमध्ये पत्रकारांशी बोलत होते. या आठवड्याच्या सुरुवातीला, भारत अमेरिकेसोबत व्यापार करार करणाऱ्या पहिल्या देशांपैकी एक असू शकतो, अशी आशा अमेरिकेचे वित्त मंत्री स्कॉट बेसेंट यांनी व्यक्त केली. गेल्या फेब्रुवारीमध्ये, भारत आणि अमेरिका व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यावर

काम सुरू करण्यास सहमत झाले, ज्यामुळे या वर्षाच्या अखेरीपर्यंत पहिला टप्पा करणे आणि 2030 पर्यंत द्विपक्षीय व्यापार 500 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवणे असा उद्देश आहे.

**कॅनडा-निवडणूक**

कॅनडातील मध्यवर्ती निवडणूकीत पंतप्रधान मार्क कार्णी यांच्या लिबरल पक्षाने वर्चस्व राखल बाजी मारली आहे.  लिबरल पक्षाचे वर्चस्व संपुष्टात आणण्यात अपयशी ठरल्यानंतर विरोधी पक्षनेते पियरे पोइलिव्हे यांनी पराभव स्वीकारला. तथापि, कॅनडा अजूनही मतांची मोजणी करत आहे आणि लिबरल पक्ष 168 जागांवर आघाडीवर आहे, तर बहुमताचे सरकार स्थापन करण्यासाठी त्यांना हाऊस ऑफ कॉमन्समध्ये 343 पैकी 172 जागा जिंकणे आवश्यक आहे.

**जम्मू-काश्मीर**

जम्मू आणि काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेवर काल रात्री पाकिस्तानी सैन्याने केलेल्या गोळीबाराला भारतीय सैन्यानं चोख प्रत्युत्तर दिलं. नौशेरा, सुंदरबनी आणि अखनूर सेक्टरच्या समोरील भागात नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्यानं भारतीय चौक्यांवर विनाकारण गोळीबार करण्यात आला. भारतीय सैन्याने जलद आणि प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. अशी माहिती संरक्षण सूत्रांनी दिली.

**आंध्रप्रदेश-अपघात**

आंध्रप्रदेशमध्ये विशाखआपट्टणम इथं सिंहाचल मंदिरात चंदनोत्सवादरम्यान आज सकाळी झालेल्या अपघातात 8 जणांचा मृत्यू झाला आणि 14 जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आज पहाटे जोरदार पावसामुळे मंदिरात उभारलेल्या मंडप भिंतीवर कोसळला आणि ही भिंत मंदिरात दर्शनासाठी रांगेत उभ्या असलेल्या भाविकांवर पडली. राष्ट्रीय आणि राज्य राखीव दलाची पथकं बचाव आणि मदत कार्य युध्दपातळीवर करत आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. आंध्र प्रदेशचे गृहमंत्री आणि जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

कोलकात्यातील एका उपहारगृहात लागलेल्या आगीत 14 जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त dd न्यूज वाहिनीनं दिली आहे.

**वेव्हज एकनाथ शिंदे**

पहिली दृकश्राव्य परिषद अर्था वेव्हज उद्यापासून मुंबईत सुरु होत आहे. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेत दृक श्राव्य आणि मनोरंजन श्रेत्रांतील भविष्यातील संधी याबाबत चर्चा होणार आहे, या शिखर परिषदेत शंभर देशांमधून एकंदर पाच हजार प्रतिनिधी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. मनोरंजन क्षेत्रातील स्टार्टअप्सना त्यांचे विचार आणि कार्यपध्दती जागतिक स्तरावरील मान्यवरांसमोर मांडण्याची, गुंतवणूकदार आणि उद्योग क्षेत्राशी जोडण्याची संधी मिळेल. अमिताभ बच्चन, रजनीकांत, चिरंजीवी, मोहनलाल, नागार्जुन, अक्षय कुमार आणि आमिर खान आदी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत वेव्हज् कार्यक्रमाच्या तयारीची काल पाहणी केली. यावेळी परिषदेबाबत सादरीकरण करण्यात आलं. या कार्यक्रमाचं यजमानपद महाराष्ट्र शासनाला मिळालं ही अभिमानाची बाब असल्याचं शिंदे म्हणाले.

**हवमान**

ओदिशा ,आसाम आणि मेघालयमधील काही भागात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. दिल्लीच्या काही भागात तर हरियाणा,चंदीगढ,उत्तरखंड,उत्तरप्रदेश,झारखंड,ओदीशा,तेलंगणा,उत्तर कर्नाटक,विदर्भ,छत्तीसगढ,पश्चिम बंगाल आणि सिक्कीम मध्ये येत्या 2-3 दिवस वादळ तसंच जोरचे वारे वाहण्याची सहकीयत आहे. पश्चिम आणि पूर्व राजस्थान, हिमाचल प्रदेश, सौराष्ट्र, आणि कच्छ च्या काही भागात उष्णतेची लाट येणेची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. आज उत्तर प्रदेशात धुळीच्या वादळाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

**क्रिकेट एशियन**

2026 मध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटला स्थान देण्यात आलं आहे. 19 सप्टेंबर ते 4 ऑक्टोबर 2026 या कालावधीत जपानच्या आयची आणि नागोया प्रीफेकचर् मध्ये या आशियाई क्रीडा स्पर्धा होणार आहेत. आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश होण्याची ही चौथी वेळ असेल. 2010 साली ग्वाङ्ग्झू इथं झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटनं पदक स्पर्धा म्हणून पदार्पण केलं.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार**